**सत्र खटला क्र. ४६/२०२४ मधील फौजदारी जामीन अर्ज**
**महाराष्ट्र शासन वि. संदीप उर्फ बाबुराव सुभाष शेवाळे व इतर**
(CNR NO. MHBU20-000700-2024)

## नि.क्र. १०० खाली आदेश
## (पारीत दिनांक ३० मार्च २०२६)

०१] अर्जदार – **अमोल जयसिंग राजपूत** याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये पोलीस ठाणे, जानेफळ येथील अपराध क्र. २०४/२०२४, कलम ३६४, ३६५, १२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

०२] अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादीचे पती दिलीप इंगळे हे पैशाचा पाऊस पाडत होते. त्यामुळे दिलीप इंगळे आणि अमोल राजपुत यांचे मध्ये काही दिवसांपासून पैशाच्या व्यवहारावरून वाद चालू होता. म्हणून आरोपी अमोल राजपुत याने कट रचून, पूर्व नियोजन करून दिनांक २२.०६.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या सुमारास संदीप उर्फ बाबुराव शेवाळे, योगेश तोंडे, शेख साजिद शेख अजीस यांच्या मदतीने संदीप दातार याची स्वीफ्ट गाडी क्र. एम.एच.-०३-बी.एच. १८२४ या वाहनात फिर्यादीच्या पतीला घातपात करण्याच्या उद्देशाने किंवा जिवे मारण्याच्या उद्देशाने जानेफळ येथून कोपरगाव, जि. अहमदनगर येथे नेले. त्यानंतर या आरोपींनी इतर अज्ञात इसमाच्या सहाय्याने फिर्यादीच्या पतीचे अपहरण घडवून आणल्याचे जबाबात सांगितले. फिर्यादी हिने पोलीस ठाणे, कोपरगाव, जि. अहमदनगर येथे फिर्याद दाखल केली. सदर फिर्याद पोलीस ठाणे, जानेफळ येथे ऑनलाईन पाठवण्यात आली. तपासादरम्यान फिर्यादीच्या पतीची निर्घृण हत्या करण्यात आली असल्याचे निष्पंन्न झाले. त्यामुळे पोलीस ठाणे, जानेफळ येथे अपराध क्र. २०४/२०२४ कलम ३६४,३६५,१२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खाली गुन्हा नोंदवण्यात आला.

०३] अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. दिलदार खान यांनी युक्तिवाद केला की, अर्जदार हा निर्दोष असून त्याचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध नाही. अर्जदाराने दाखल

केलेला अगोदरचा अटकपूर्व जामीन अर्ज दोषारोपपत्र दाखल होण्यापूर्वी नामंजूर करण्यात आला. परंतु आजरोजी या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल झाले असल्याने परिस्थितीत बदल झालेला आहे. परिणामी अर्जदाराने जामीन अर्ज दाखल केला आहे. अर्जदारातर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, अतिरिक्त न्यायीक कबुली जबाबाच्या आधारावर फिर्यादीने विचारपूर्वक खोटी फिर्याद पोलीस ठाणे, जानेफळ येथे दाखल केली. अर्जदाराचे नाव फिर्यादीत नमूद असले तरी त्यामध्ये वेळ, तारीख, स्थळ व अर्जदाराच्या कृत्याविषयी काहीही नमूद नाही. अर्जदार हा घटनास्थळावर हजर होता याचा उल्लेख पूर्ण दोषारोपपत्रात कुठेही आलेला नाही. घटना ही दिनांक २२.०६.२०२४ रोजी घडल्याचे अभिलेखावरून दिसून येते. फिर्यादीचे पती आरोपी संदीप याच्यासोबत गेले असल्याचे तिला पहिल्याच दिवशी माहित होते. परंतु दिनांक ०९.०७.२०२४ रोजी आरोपी संदीप याच्या सांगण्यावरून फिर्यादीने उशिरा फिर्याद दाखल केली. अर्जदाराचा मयत दिलीप इंगळे याची हत्या करण्याचा कोणताही पूर्व नियोजित हेतू नव्हता. दुसऱ्याने केलेल्या गुन्ह्यात अर्जदाराला फसवण्यात आले आहे. केवळ फोन कॉलच्या आधारे व पुरवणी जबाबाच्या आधारे अर्जदारावर आरोप ठेवण्यात आले आहे. परंतु अर्जदार अमोल हा घटनेच्या वेळेस अमरनाथ येथे गेलेला असल्याने त्याचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध नाही. पैशाच्या पावसाबाबत अर्जदाराविरूद्ध इतर कोणत्याही गुन्ह्याची नोंद नाही. अर्जदार हा सुरूवातीला तपासादरम्यान तपासी अंमलदारापुढे हजर झालेला होता. त्यामुळे तो फरार होते हे म्हणणे चुकीचे आहे. उलट मयत दिलीप इंगळे याच्याविरूद्ध बरेच गुन्हे दाखल असून त्याचे अनेक व्यक्तींसोबत पैशाच्या पावसाचे कारणावरून वैमनस्य घेतले होते आणि त्या व्यक्तीपैकीच कोणीतरी त्याला मारून टाकले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

०४] अर्जदारातर्फे पुढे युक्तिवाद करण्यात आला की, अतिरिक्त न्यायीक कबुली जबाब हा कमकूवत पुरावा असल्याने त्याआधारे अर्जदाराला दोषी ठरवता येत नाही. या प्रकरणात संपूर्ण जप्ती झालेली असून अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. अर्जदार अमोल विरूद्ध असलेले गुन्हे हे किरकोळ स्वरूपाचे असून पैशाच्या पावसाबाबत कोणताही गुन्हा त्याच्याविरूद्ध नोंद नाही. अर्जदाराने षडयंत्र कधी व कोठे केले याबाबतचा पुरावा नाही. पूर्ण प्रकरणत परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे. परंतु अर्जदाराला प्रत्यक्ष

व अप्रत्यक्ष या गुन्ह्याशी जोडणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. या प्रकरणातील दोन आरोपी माननीय सर्वोच्च न्यायालय व माननीय उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी जमानतीवर सोडलेले आहे. त्या आरोपींच्या कृत्याच्या तुलनेत अर्जदाराचे प्रत्यक्ष कोणतेही कृत्य नाही. त्यामुळे अर्जदार समन्याय तत्वाच्या आधारे जमानत मिळवण्यास पात्र आहे. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. म्हणून अर्जदाराला जामीन देण्यात यावा अशी विनंती करण्यात आली. अर्जदाराच्या वतीने खालील न्यायनिवाड्यांवर भीस्त ठेवण्यात आली.

**[01] Suraj Dadaso Zende Vs. The State of Maharashtra, in Criminal Bail Application (BA) No. 1183/2025, 18.12.2025.**

**[02] Bhushan Vs. The State of Maharashtra, in Criminal Appeal arising out of SLP (Crl.) No(s). 13740 of 2025.**

०५] याउलट, विद्वान सरकारी वकील कु. आर. डी. बावस्कार यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, प्रस्तुत प्रकरण हे अपहरण आणि हत्येचे असून परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे. अर्जदार अमोल याच्याविरूद्ध १५ गुन्ह्यांची नोंद असून तो गुन्हेगारी प्रवृत्तीचा इसम आहे. मयत दिलीप इंगळे हा अर्जदार अमोलच्या मदतीने पैशाचा पाऊस पाडत असल्याचा त्याच्यावर आरोप आहे. सी.डी.आर. मध्ये घटनेच्या दिवशीचे संभाषण आहे. अर्जदार हा घटना तारखेपासून फरार आहे. या प्रकरणात मोबाईल आणि बोलेरो जीप जप्त होणे बाकी आहे. अर्जदाराचा या गुन्ह्यात सहभाग आहे. तसेच या गुन्ह्यात इतर अज्ञात आरोपींचा देखील समावेश आहे. त्यामुळे अर्जदार साक्षीदारांना फितूर करू शकतो व न्यायापासून पलायन देखील करू शकतो. म्हणून अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०६] दोन्ही पक्षाच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने केस पेपरची पाहणी करण्यात आली. येथे महत्त्वपूर्ण बाब नमूद करणे असे की, सुरूवातीला अर्जदार अमोल याचेविरूद्ध फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ खालील फरार आरोपी म्हणून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. घटना ही दिनांक २२.०६.२०२४ रोजी घडली व त्यानंतर तब्बल दीड वर्षांनंतर दिनांक ०६.०१.२०२६ रोजी अटक करण्यात आली. त्यानंतर अर्जदाराने दोषारोप वाचून

दाखवल्यावर गुन्हा कबुल नसल्याचे व्हीडीओ कॉन्फ्रंन्सींगवर सांगीतले. परंतु त्यानंतर तुरूंगात अर्जदार/आरोपीची जबानी वर सही घेण्यास पत्र पाठविले असता, आरोपीची जबानी (Plea of accused) वर अर्जदाराने सही करण्यास जाणीव पूर्वक नकार दिला. त्यामुळे खटला चालवण्यास अकारण विलंब झालेला आहे. त्यामुळे या सर्व बाबी अभियोग पक्षाच्या युक्तिवादाचे समर्थन करतात.

०७] याशिवाय, फिर्याद पाहता सुरूवातीपासून अर्जदार व मयत दिलीप इंगळे पैशाचा पाऊस पाडत असल्याचा व त्यांच्यात त्या कारणावरून वाद असल्याचा उल्लेख आहे. सी.डी.आर. व एस.डी.आर. नुसार अर्जदाराचा या गुन्ह्याशी संबंध आहे. प्रस्तुत प्रकरण हे अपहरण आणि हत्या करण्याचे असल्याने गुन्ह्याचे स्वरूप अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणातील मयत दिलीप इंगळे याची पाईपाच्या सहाय्याने निर्घृण हत्या करण्यात आली आहे. हत्येकरिता षडयंत्र रचण्यात येऊन बऱ्याच आरोपींची मदत घेण्यात आली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण हे अतीशय गंभीर स्वरूपाचे अपहरण करून, कटकारस्थान रचून हत्या करण्याचे आहे. अर्जदार अमोल याचेविरूद्ध विनयभंग, अपहरण, हत्या, जुगार, शासकीय कामात अडथळा, शासकीय कर्मचाऱ्यास मारहाण अशा स्वरूपाच्या १५ गुन्ह्यांची नोंद आहे. त्यामुळे अर्जदार अमोल याची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे स्पष्ट होते.

०८] याशिवाय जामीन अर्ज विचारात घेतांना अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो फरार होऊ शकतो काय ? हे पाहणे आवश्यक आहे. यासाठी न्यायालयाने अभिलेखावरील सर्व दस्तऐवजांची बारकाईने पाहणी केली आहे. फिर्याद, प्रथम छापील खबर आणि साक्षीदारांची बयाणे यावरून असे दिसून येते की, अर्जदार अमोल राजपूत आणि मयत दिलीप इंगळे हे पैशाचा पाऊस पाडण्याचे काम करत असल्याचे साक्षीदारांना माहिती होते. याच कारणावरून अर्जदार अमोल व मयत दिलीप इंगळे यांच्यात पैशाचा वाद असल्याचे साक्षीदारांच्या बयाणावरून दिसून येते.

०९] याशिवाय आरोपी संदीप याने फिर्यादीला घटनेबाबत माहिती दिली असल्याचे फिर्यादीवरून दिसून येते. तथापि सुरूवातीला केवळ अपहरणाचा गुन्हा नोंद झालेला होता व त्या फिर्यादीत अर्जदार अमोल हा मुख्य सुत्रधार असल्याचे दिसून येते. त्यानंतर दिलीप इंगळे

याची हत्या झाली असल्याने अर्जदाराचा या गुन्ह्याशी संबंध असल्याचे प्रथम–दर्शनी दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की, अतिरिक्त न्यायीक कबुली जबाब हा कमकुवत पुरावा आहे. परंतु अभिलेखावरील इतर साक्षीदारांच्या बयाणावरून अर्जदाराचा या गुन्ह्याशी संबंध असल्याचे दिसून येते. अर्जदार अमोल हा अमरनाथ येथे गेल्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आला नाही. त्यामुळे ही बाब बचाव पक्षाचे समर्थन करत नाही. अर्जदार अमोल याचेविरूद्ध आरोप आहे की, त्याने मयतास मोबाईल दिला होता. सदरहू मोबाईल आणि गुन्ह्यात हत्या करण्यासाठी वापरलेले बोलेरो वाहन जप्त करणे बाकी आहे. या गुन्ह्यात अनेक अज्ञात इसमांचा सहभाग आहे. त्यामुळे इतर अज्ञात व्यक्तींची चौकशी, गुन्ह्यात सहभागी असलेल्या आरोपींची माहिती, गुन्ह्यात वापरलेले बोलेरो वाहन आणि मोबाईल जप्ती कामी अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील तथ्य व परिस्थिती व अर्जदाराने भरोसा ठेवलेले प्रकाशित न्यायानिवाड्यातील तथ्य परिस्थिती यामध्ये फरक आहे. म्हणून अर्जदाराला प्रकाशित न्यायनिवाड्यांचा लाभ होत नाही.

**१०]** या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल झाले असले तरीही अर्जदाराविरूद्ध नोंद असलेल्या गुन्ह्यात मृत्यूदंडाची तरतूद आहे. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो तपासात सहकार्य करणार नाही. याउलट अर्जदार साक्षीदारांवर दबाव आणून त्यांना फितूर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. न्यायापासून पलायन करण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. म्हणून गुन्ह्याचे स्वरूप, गंभीरता, गुन्ह्यासाठी असलेली शिक्षेची तरतूद, अर्जदाराचे कृत्य आणि तपासाची स्थिती पाहता अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

नियमित जामीन अर्ज (नि.क्र. १००) नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR

Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.03.31 18:28:25 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – ३०.०३.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – ३०.०३.२०२६